भास्कर चंदनशिव यांच्या कथेतील दलित शोषित वर्गाचे चित्रण

सारांश :-

-ग्रामीण वास्तवतेचा अविष्कार प्रा . भास्कर चंदनशिव यांच्या कथेतुन प्रभावीपणे दिसतो . 1970 सालापासुन चंदनशिव यांचे कथालेखन चालु आहे . चंदनशिव यांनी कथेचे संवाद आणि निवेदन बोली भाषेतच केले आहे . संवादासाठी बोली भाषा आणि निवेदनसाठी प्रमाणभाषा वापरणे असे करित नाहीत त्यामुळे प्रत्यक्ष असे जीवन अनुभवलेला पाहिलेलेच असणा यापैकी कुणीतरी ही कथा सांगतोय अशी आपणास जाणीव होते . साहाजिकच त्यांच्या कथेत एक प्रकारचा जिंवतपणा वास्तवपणा येतो . वास्तववादी प्रवृत्तीमुळे वाचकाला कथा वाचताना प्रत्यक्ष त्या कथेतील जिवनात उतरण्याचा अनुभव येतो . ग्रामीण जीवनातील दलित शोषीतांचे दुःख दारिदय्र त्यांनी आपल्या कथेदवारे परिणामकारकरीत्या मांडलेले आहे .



महादेव अंकुश गायकवाड

मु . पो ः भांडगाव ता . इंदापुर जि . पुणे

प्रस्तावना :-

सर्वसाधारणपणे **1950** ते **2000** असा अर्धशतकाचा कालखंड हा चंदनशिवाच्या कथेच्यादवारे आलेले दिसतो . बीड उस्मानाबाद जिल्हयाचा परिसर हा त्यांच्या कथेत येतो . हा मराठवाडयाचा भाग सततच्या दुष्काळान पिचलेला आहे त्यांच्या कथेत पाटील, देशमुख ,सरपंच आहेत . तशी बारा बलुतेदार आणि **18** अलुतेदार ही मंडळीही येतात . कामगार, मुकादम, ऊसमालक ,शेतकरी ऊसतोडकामगार, तलाठी, शाळामास्तर, सालगडी, गुराखी वेडी, अर्धवडी, शहाणी, अतिशहाणी, संत सज्जन, दृष्ट दुर्जन, विकृत, लिंगापिसाट, बायकी, सामलिंगी, नपुसंक, अर्धनपुसंक, अशी सर्व तऱ्हेची माणस त्यांच्या कथेची भागीदारी आहेत . समाजतील विविध प्रश्न त्यांनी आपल्या कथेदवारे मांडले आहेत . शेती आणि शेतकऱ्यांचे ,प्रश्न शिक्षण ,व्यवस्थेचे, प्रश्न दलित सवर्णांचे संघर्ष, विषयवासनेचे मोहळ ,वेडयांचे विश्व ,बालकांचे मनोविश्व, अस्पृष्यतेच्या प्रश्नांचे, कंगोरे वयस्कर माणसाचे हाल विस्थापितांचे प्रश्न दुष्काळच्या कळा कलाकाराची होणारी परवड विदयापीठ नामांतराच्या संगर जातीभेदाच्या पलीकडे जाणारी नात्याची कोवळीक असे विवीध विषय त्यांनी आपल्या कथेच्यादवारे हाताळले आहेत ,त्यांची कथा सर्वसमावेशक असल्याने सर्व वाचकांना आपली वाटल्याशिवाय राहात नाही . ग्रामीण भागातील मातीशी इमान राखणारी चंदनशिव यांची कथा आहे . सामजिक चिंतनाचे अचाट बाळकडु त्यांच्या कथेदवारे आपणास दिसुन येतो .

कोणताही लेखक ज्या वातावरणात परिसरात राहतो . त्याचे प्रतिबींब त्यांच्या लेखनात पडलेले असते . याला चंदनशिव ही अपवाद नाहीत . मराठवाडयातील ज्या भागात ते जन्मले तेथील अविकसीत माळरानसदृश्य परिसर त्याभागातील लोकांची परंपरा त्यांची श्रदधाळुमने ,निजामकालीन राजवटीचे अवशेष हे सारे त्यांच्या कथेत येते . पुढे काही काळांनी त्यांच्या ग्रामीण साहित्य चळवळ आणि शरदजोशींची शेतकरी संघटना यांच्याशी संबध आला . यातुन वैचारीक भुमिका तयार झाली . यातुनच त्यांना लेखनाचा सुर सापडला . चंदनशिवाच्या कथेच्या कथेचा आवाका गाववेशीच्या आतील आणि गाववेशीच्या बाहेरच्या म्हणजेच गावकुसाबाहेरच्या असा दोन्हीही आहे ग्रामीण भागातील सामान्य माणुस हा चंदनशिव यांच्या चिंतनाचा विषय आहे .

1.2 ः दलित शोषित वर्गाचे चित्रण ः

चंदनशिव यांच्या 'जांभळढव', 'मरणकळा', 'नवी वारूळ', 'विरडत्या कथा संग्रहातील काही कथांमधुन दलित शोषित वर्गाचे व्यथामय जीवन चित्रीत केले आहे . देश स्वतंत्र झाल्यावरही अनिष्ट रूढी परंपरामुळे दलीतांना समानतेची वागणुक मिळत नाही त्यामुळे त्यांची कुचंबना होते . याबाबतीत त्यांच्या कथेसंदर्भात फ . मु . शिंदे लिहीतात ''मराठी वांडमयातील नव्या जाणिवांच्या आधुनिक प्रवाहाला प्रगल्भ आणि प्रतिष्ठीत करणार त्यांच कथा साहित्य प्रदेशाच्या,भाशेच्या,जातीपातीच्या,सीमा,पार करून निखळ जिवांच्या जवळीकचे जलाशय जतन व्हावेत म्हणुन जन्मतं''**1** . सर्व समावेशक शोषितांच्या व्यथा वेदनांचे चित्रण करताना जातिपातीच्या पलीकडे जाऊन ते सर्वव्यापकपणे दलित शोषितांचे चित्रण करतात . ग्रामीण माणुस डोळयांपुढे ठेवूनच त्यांचे कथालेखन झाल्याचे दिसते .

भास्कर चंदनशिव यांच्या 'जांभळढव्ह' या कथा संग्रहातील 'आग', 'पाणी', 'मसणवाटा' आणि 'निवडणुक' या कथा मधुन दलित जीवनाचे वास्तव चित्रण झालेले आहे . दलितांना पिण्याचे पाणीही सहजासहजी मिळत नाही . याचे वास्तवचित्र 'पाणी' या कथेत आले आहे . ग्रामीण भागात पिण्याचे पाणी नदी किंवा विहीर यादवारे मिळते . ऊन्हाळयात नदया आटल्यावर पाण्याचा प्रश्न गंभीर बनतो . पाणी या कथेतील गावात ग्रामपंचायतीच्या वतीने एक विहीर पाण्यासाठी खोदलेली असते . पण विहीरीचे पाणी घेण्याचा हक्क दलितांना नसतो . कारण दलित हे अस्पृश्य समजले गेल्याने त्यांच्या स्पर्शाने पाणी बाटते अशी समजुत ग्रामीण भागात बऱ्याच प्रमाणात असल्याने सार्वजनीक विहीरीवर पाणी भरण्यास सर्वांकडुन दलितांना विरोध केला जातो . घागरभर पाणी मिळेल यासाठी सार्वजनीक विहीरींच्या भोवती आपली भांडीकुंडी घेऊन दलितांना वसाव लागतं . एखादया वेळीस कुणीच सवर्ण नसेल तर पाणी न घेताच त्यांना रिकामं घरी परताव लागतं . या अडचणीमुळे दलित माणसे श्रमदानातुन स्वंतःचा हिरा खोदायचा निर्णय घेतात . तो खोदतात पण हा हिरा सवर्णाच्या हिऱ्याच्या वरच्या बाजुला असतो . तो सवर्णांना मान्य नसतो . तो हिराच बुजवुन टाकण्याच निर्णय घेतला जातो . त्याप्रमाणे सगळा गाव एकत्र होऊन दलितांनी खोदलेल्या हिऱ्याकडे जातो व एका रात्रीत तो हिरा बुजवुन टाकतात . दलितांनी स्वःतचा प्रश्न स्वतः सोडविलेला असतो . . पण सवर्णांना तो हिरा मान्य नसल्याने तो बुजवुन दलितांना पाण्याचा हक्क म्हणजे जीवनच नाकरतात . यातुन दलित जीवनाची व्यथा चंदनशिव प्रकट करतात .

'मरणकळा' या कथासंग्रहातील 'कावड', 'गुन्हेगार', 'सरपंच' 'इलाज' आणि 'वतनाचा इनाम' या कथांमधुन कमी अधिक प्रमाणात दलित जीवनाची दुःख यातना प्रकट झाल्या आहेत . इलाज या कथेत सदा हा दलिताचा मुलगा मॅट्रीक पास होतो . दोघेही आंबेजोगाई स शिक्षणासाठी एकत्र राहतात . पण गावात आल्यावर अस्पृष्यता पाळावीच लागते . खुप शिकला प्रतिष्ठा मिळाली तरी दलितांना आपल्या पायरीनेच वागावे लागते . ही समाज मनाची मानसिकता शिकलेल्या पिढीची मानसिक कुंचबना केल्याशिवाय राहात नाही हेच या कथेतुन दिसुन येते .

दलितांच्या दुःखमय जीवनाचे चित्रण करणारी 'मला काय त्याचं'ही एकमेव कथा अंगारमाती कथासंग्रहामध्ये आहे या कथेतील 'दलित मित्र' पुरस्कार मिळविणारे 'बापुसाहेब देसाई हें दलितांबद्दल कळवळा दाखवित असेल तरी हृदयातुन मात्र पुर्णत्वाने दलितद्वेशाने भरलेले दिसुन येतात.त्यानी केलेल्या कृत्यावरुन त्यांच्या दलित विरोध दिसुन येतो. देसाइ हा अत्यंत कावेबाज माणुस होता. सर्व दलितांनी त्याचा कावेबाजपणा ओळखला असला तरी देसायाची श्रीमंती व गावातले त्याचे वजन पाहाता हा आपल्या विरोधी असलेला माणुस दलितांना सहन करावा लागतो

1.3 कामगार श्रमकरी वर्गाची वेदना

अंगारमाती मधील वेगवेगळया कथांमधून चंदनशिवे यांनी शेती विषयक विविध प्रश्न मांडले आहेत. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना विरूद्ध ऊसतोड कामगार असा संघर्ष तोडणी या कथेत मांडला आहे.

मराठवाडयातील बीड, उस्मानाबाद हे जिल्हे सतत दुष्काळाच्या सावटाखाली जगतात. प्रचलित

समाजरचनेतील ऊसतोड कामगार हा एक अपेक्षित असा वर्ग आहे. पोटासाठी ऊस तोड कामगार म्हणून मराठवाडयातील लोकांना पश्चिम महाराष्ट्र दरवर्षी येणे भाग पडते त्यांच्या अनेक समस्या आहेत. अडीअडचणी आहेत. कमी दामात जास्त श्रम करवून घेण्यासाठी मुकादमांत स्पर्धा असते त्यामुळे सहाजिकच ऊसतोड कामगार हा शोषितांचाच प्रतिनिधी आहे. चंदनशिवांच्या कथेच्या बाबतीत डॉ. वासुदेव मुलाटे पुढील मत नोंदवितात. '' भास्कर चंदनशिव माणसातला माणूस कप्पे, चोरकप्पे त्याचे नेमके खोलवरचे दुःख उलगडून दाखविण्याचा प्रयत्न करतात.'' 2 शोषण आणि त्यातुन निर्माण होणारे दुःख चंदनषिवे प्रभावीपणे मांडतात त्यांच्या कथेत अस्सल, वास्तवपणा आढळतो.

1.4 शेतकरी कष्टकरी वर्गांच्या समस्यांचे चित्रण :–

चंदनशिवे यांनी अंगारमाती या कथासंग्रहात शेतकरी कष्टकरी वर्गांच्या समस्यांचे चित्रण केले आहे.

कृषिसंस्कृतीच्या व्यापक समस्यांचे दर्शन 'बिरडं' या कथासंग्रहातही दिसून येते. 'कळा' या कथेत शेतीवरील दुष्काळाचे संकट कसे असते यांचे वर्णन येते तर 'होळी' या कंथेत ऊसतोडीचा प्रश्न रेंगाळल्यामुळे आपल्याच ऊसाची आपणाच होळी करणारा अगतिक असा शेतकरी भेटतो. पोळा या सणाचे सुंदर, हुबेहुब वर्णन मुकी हालगी या कथेत वाचायला मिळते. कृषिसंस्कृतीत पोळा या सणाला फारच महत्त्वाचे स्थान आहे. हलगीच्या तालावर बैलाची मिरवणूक काढण्यास येत असते. दरवर्षी बैलपोळयाला हलगी वाजवणारा शेष्या मांग अचानक मरतो, अन् त्याच्या मुक्या हलगीसोबत गावही मुका होतो. याच सुंदर वर्णन मुकी हालगी मध्ये चंदनशिव करतात. चंदनशिव यांनी शेतकरी, कष्टकरी वर्गांच्या समस्या आपल्या कथेच्या माध्यमातून अतिशय प्रभावीपणे मांडल्या आहेत. याबाबतीत इंद्रजित भालेराव म्हणतात. '' भास्कर चंदनषिव यांनी अनुभवांना दिलेली सामजिक चिंतनाची जोड त्यांना बाबुराव बागुल यांच्या पंक्तीत नेऊन बसवते .'' 3 . चंदनशिव यांच्या कथेत अनुभवाचा आणि निरीक्षणाचा सच्चेपण आढळतो . त्यामुळे ग्रामीण भागातील सामान्य माणसाचे दुःख कष्ट यातनामय जीवन प्रभावीपणे चंदनशिव आपल्या कथेदवारे चित्रीत करतात .

1 . 5 . ग्रामीण स्त्री जीवनाचे चित्रण

चंदनशिव यांच्या कथेतील स्त्रीचा संघर्ष हा वेगवेगळया प्रकारचा आहे . ग्रामीण भागातील, अज्ञान, दुःख, दारिद, राजकारण, जातीयता यांच्यासी तिला सतत संघर्ष करावा लागेल .

चंदनशिव यांच्या 'आग' या कथेतील 'फुली' ही दारीदय्राने ग्रासलेली आहे . घरात कमालीचे दारिद्र असल्याने नवरा कमाईसाठी बाहेरगावी गेला आहे . तर फुली इतरांच्या शेतीमध्ये रोजंदरीची कामे करते . कामावर असतानाच धना पाटलाचा मुलगा तिच्यावर बलात्कार करतो . घरी आल्यावर फुली आपल्या म्हाता्या सास्याला या घटनेची सारी कहाणी सांगते . परिस्थीतीने गरिब व जातीने हलका असल्याने बंका फुलीचा सासरा मुकाटयाने अन्याय सोसण्याचे ठरवितो . कारण श्रीमंत धना पाटलास याबाबतीत तो जाब विचारू शकत नाही . मात्र याच गोष्टीचा फुलीला अतीशय राग येत असतो . सास्याचे असले वर्तन आणि आपल्यावर झालेला अन्याय हे सारे फुलीच्या बोलण्यातुन अतिशय संतापणे व्यक्त होत असते . स्त्रियांना अशा बिकट प्रसंगाला ग्रामीण भागात नेहमीच तोंड दयावे लागते . अशा बलात्कारीत स्त्रीया केव्हा केव्हा आपले स्ववतचे मानसिक संतुलन बिगडुन बसतात . चंदनशिव यांच्या कथेतील स्त्रीयांबावत मधु सांवत म्हणतात " भास्कर चंदनशिव यांच्या कथेमधील स्त्रिया शोषीत आहेत . दुःखात वेदनेची सोबत गेऊन त्या दुबळया मनाने आश्रितासाख्या जगत असतात . " 4 खरोखर ग्रामीण भागातील स्त्रीयांना समाजत आज दुय्यमच स्थान आहे . तिला दुस्याच्या आश्रयाने जगावे लागते . तिचे कमालीचे शोषण होत असते .

'बिरड'या कथासंग्रहातील 'वासना' ही एकमेव दलित जीवनावर लिहलेली कथा चंदनशिवांनी चित्रीत केली आहे . या कथेत माय व तीची लेक असलेले दोघींचच कुटुंब दलितवस्तीत राहत आहे . दलित भागा नावच्या स्त्रीची 'पुतळी' एकमेव आधार असलेली मुलगी आहे . भागा बरीच दिवस आजारी असल्याने आणि तीला औषधपाणी न मिळाल्याने तीच्या तोंडाची चव जाते . म्हातारील लवकर बर वाटाव तिच्या तोंडाला चव यावी यासाठी तीला सागुती खाऊ घालावी म्हणुन गंगु मावशी पुतळीला सांगते . गरीबीमुळे व घरात गडी माणुस कर्ते नसल्याने या मायलेकीला सागुती खायला मिळत नाहीत . दुस्या दिवशी देसायच्या रानात डव्हारा होणार असल्याची बातमी मिळाल्यावर पुतळीला आनंद होतो . कारण आपल्या मायला सागुती खायला मिळेल असे तिला वाटते . ती देसायाच्या रानात सगुतीसाठी जाते . पण अंधार पडेपर्यंत तिला तेथे काहीच मिळत नाही . शेवटी नाही होय करीत कशीतरी थोडीपार सागुती मिळते . शेवटी सागुती वाढणारच तिला वाटेत आढवुन तिच्यावर बलात्कार करतो . अत्याचार ग्रस्त पुतळी शेवटी आपल्या घरी रिकाम्या हाताने येते . पण ती आपली आबु गमावुन बसलेली असते . ग्रामीण भागात दलित स्त्रीचे शारीरिक, मानासिक, लैंगीक शोषण खुप मोठया प्रमाणात होत असल्याचे दिसते . पोटासाठी स्वःतची आबु त्यांना गहाण ठेवावी लागते . या कथेतुन भागा या आपल्या आईविषयी पुतळीची आंतरिक तळमळ व सवतःच्या अबुला जपण्याचा केविलपणा प्रयत्न चंदनशिवांनी यथार्थपणे मांडला आहे . याबावत अशोक देशमाने लिहतात की "गावकुसातील आणि गाववाहेरील माणसांचे जीवन व्यवहार प्रकट करून शोषित कष्टकरी दुबळेपणाचा त्यांना मिळालेला शाप व शापमय जीवनात जगणारी ही माणसे रंगवून चंदनशिवांनी इथल्या समाजव्यवस्थेच्या बुरख्या फाडण्याचे काम केले आहे ."5 ग्रामीण भागतील सामान्य माणसाचे दुःख कष्ट यातनामय जीवन प्रभावीपणे चंदनशिव हे आपल्या कथेदवारे चित्रीत करतात .

1 . 6 ः निष्कर्ष

1 . मराठवाडयातील ग्रामीण भागातील निरनिराळया प्रकारची माणसं त्यांचे परस्परांतील सहसंवध याचे प्रभावी चित्रण चंदनशिव करतात . गाववेशीआतील आणि वेशीवाहेरील माणसाचे जीवन व्यवहार ते चित्रीत करतात . दीन दुबळया कष्टकरी शोषित माणसाची जिवनचिरीत्रे रंगवुन ग्रामीण समाज व्यवस्थेचे सत्यस्वरूप समाजमनपुढे मांडले आहे .

2 . ग्रामीण माणसाला जीवन जगत असताना आपल्या अस्तीत्वासाठी भुक दारिदय्र शोषण जातीवादीमुळे निर्माण होणाऱ्या विविध प्रश्नांशी सघर्ष करावा लागतो . आपल अस्तीत्व ठेवण्यासाठी या सा यांची संघर्ष करीत करीतच जगावं लागत .
3 . ग्रामीण भागातील सामान्य माणसाच जगण आणि त्यासाठी त्याला करावा लागणरा वेळोवेळीचा संघर्ष चंदनशिव यांच्या कायम चिंतनाचा विषय असल्याचे त्यांच्या अनेक कथामधुन दिसुन येते . आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांना कराव्या लागणाऱ्या संघर्षाची, धडपडीची ,प्रयत्नांच्या पराकाष्टांची, सामान्य माणुस केंद्रीभुत ठेवुन आपल्या कथांदवारे प्रभावीपणे मांडणी केली आहे .

1.7 संदर्भसुची

1 . फ . मु . शिंदे , मानोगत, विरड, भास्कर चंदनशिव, साकेत प्रकाशन औरंगाबाद दुसरी आवृत्ती **2007** पृष्ठ क . मलपृष्ठावरील मजकुर .
2. डॉ. वासूदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य स्वरूच व दिशा, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद प्रथमावृत्ती जुन 1994 पृष्ठ 108
3. इंद्रजित भालेरावॉ प्रस्तावनाॉ लाल चिखलॉ लोकवाङ्मय गृह मुंबई, पहिली आवृत्ती जुलै 2009 पृष्ठ क 25
4. मथु सावंत, कथाकार भास्कर चंदनशिव, संगत प्रकाशन नांदेड, दुसरी आवृत्ती जानेवारी 2006 पृष्ठ क. 196.
5. प्रा. अशोक देशमाने, चंदनशिवांची कथाः स्वरूपमीमांसा, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 24 एप्रिल 2008 पृष्ठ क. 89